


महंमद रफी आणि
सज्जाद हुसेन

जो वादा किया वो...

आठवणीतली 'वादा' गीतं

वादागीतं हा हिंदी चित्रपट संगीतातला तसा जिव्हाळ्याचा विषय. विरहाचं दुःख सुसह्य करणारी अशी ही काही अविस्मरणीय 'वादागीतं'

□ अजित पोपट

शास्त्रीय संगीत हा विषय घेऊन पदवी किंवा पदविका मिळवणाऱ्यांना किंवा शास्त्रीय संगीतात स्नातक मिळवू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना कितीतरी राग आणि ताल अनिवार्यपणे शिकावेच लागतात. अशा अभ्यासक्रमात सर्वप्रथम शिकवला जातो तो राग भूप किंवा भूपाळी. या रागात एक सुंदर सिनेगीत आहे 'सायोनारा, सायोनारा वादा निभाऊंगी सायोनारा...'


सायोनारा हा जपानी शब्द. त्याचा अर्थ आहे अच्छा, टाटा. पुन्हा भेटूचा प्रेमळ संकेत देत नायिका नायकाचा निरोप घेताना हे गाणं म्हणते. *लव्ह इन टोकियो* चित्रपटासाठी आशा पारेखवर हे गाणं चित्रित करण्यात आलं आहे. शंकर-जयकिशनचं संगीत आहे. जितुभाई मेहतांनी हे गीत राग भूपाळीमध्ये का स्वरबद्ध केलं अशी शंका उपस्थित केली तेव्हा जयकिशननी त्यांना समजावलं, 'या चित्रपटाचं कथानक जपानच्या भूमीवर घडतंय. जपानी आणि भारतीय संगीतात बरीच साम्यस्थळं आहेत. भूपाळी रागाप्रमाणेच जपानी संगीतातही सा रे ग प आणि ध स्वर असलेला राग आहे.

जागतिक संगीताचा असा सखोल अभ्यास असणाऱ्या शंकर-जयकिशनच्या परिश्रमांमुळेच इतकं सुंदर गीत आपल्याला ऐकायला मिळालं. अशी बरीच 'वादा गीतं' हिंदी चित्रपट संगीतात ऐकायला मिळतात. याचं कारण या चित्रपटांचा गाभा प्रेम हा असतो आणि प्रेमिकांना एकमेकांचा विरह अजिबात सहन होत नाही. निरोपाचे क्षण जवळ आले की पुन्हा भेटण्याचे संकेत आधी ठरवले जातात, तशी वचनं दिली-घेतली जातात. या वचनांत त्यांच्या प्रेमाची साक्ष मिळते, विरहाच्या पिडेचा प्रत्यय येतो.

काही वर्षांपूर्वी संगीतकार नौशाद यांच्या आत्मचरित्राचा प्रकाशनसोहळा होता. त्यावेळी एकेकाळची गायिका-अभिनेत्री सुरैया हिची



लाडिक वादागीतं देणाऱ्या लतादीदी



मुकेश



महंमद रफी

भेट झाली. अर्थातच संगीत या आवडत्या विषयावर गप्पांची मैफिल रंगली. सुरैयाची आवडती गाणी कोणती असा प्रश्न विचारल्यावर तिने दोन-चार मुखडे गाऊन दाखवले. त्यातलं एक गीत *प्यार की जीत*चं होतं. राजेंद्र कृष्णाच्या शब्दांना हुस्नलाल भगतराम यांनी स्वरबद्ध केलं होतं. सुरैया म्हणाली, 'दोन्ही भावांची प्रतिभा अलौकिक होती. एका गीतासाठी त्यांनी मला तीन-चार बंदिशी ऐकवल्या. वर यातली कोणतीही धून तुझ्या गळ्यातून सहज बाहेर पडेल असंही सांगितलं. कोणती धून घ्यायची याचा निर्णय त्यांनी माझ्यावर सोपवला आणि ते गाणं माझ्या आवडत्या गाण्यांपैकी एक झालं. गाण्याचे बोल होते –

'ओ दूर जाने वाले
वादा न भूल जाना
रातें हुई अंधेरी
तुम चांद बन के आना...'

प्रियकर जवळ नसल्यामुळे ती रात्र प्रेयसीला अधिक गडद वाटतेय. अशा रात्री तिच्या मनातली अनामिक भीती दूर होण्यासाठी प्रियकराच्या खुशालीची बातमी किंवा खुद्द प्रियकर येणं चंद्राच्या शीतल प्रकाशाइतकं प्रिय वाटेल असं तिला सुचवायचं आहे. नेमकी हीच प्रतीक्षा करून दमलेल्या प्रेयसीची व्यथा लताच्या *शबाब* चित्रपटातील एका गाण्यातून व्यक्त होते. त्या गाण्याचे बोल याप्रमाणे आहेत.

'आये न बालम
वादा कर के
थक गये नैना
धीरज धर के...'


वादा गीतांत अविस्मरणीय ठरावी अशी आणखी दोन-चार गाणी सांगता येतील.

'जो वादा किया वो निभाना पडेगा
रोके जमाना चाहे रोके खुदाई
तुमको आना पडेगा...'

१९६३मध्ये प्रदर्शित झालेल्या एम. सादिकच्या *ताजमहाल* चित्रपटातलं हे गीत. संगीतकार रोशनने या गीताची धून कशी बनवली त्याची आठवण इतक्या वर्षांनंतरही प्रदीपकुमारच्या मनात ताजी आहे. आणि त्याबद्दल बोलताना आजही त्यांच्या डोळ्यांच्या कडा पाणावतात. ते म्हणाले, 'सनी आणि सादिक दोघंही कारदार स्कूलचे. कारदार बॅनरसाठी मोठ्या प्रमाणावर नौशादचं संगीत असायचं. एका पार्टीत रोशन-सादिक यांची गाठ पडली. सादिकनी रोशनला सांगितलं, की त्यांना ऐतिहासिक चित्रपट बनवायचा आहे. त्यासाठी मला सरळ पण वेगळ्या चाली हव्या आहेत. यावर रोशनने सांगितलं. तुम्ही मला एक-दोन गाण्यांचे मुखडे सांगा. नंतर आपण पाहू.

झालं, पार्टी संपली तसा हा विषय संपला. सादिकने साहिर लुधियानवीला याबाबत सांगितलं. रोशन आपल्यासाठी आकर्षक चाली बांधणार असंही सांगितलं. त्यासाठी रोशनला एक-दोन मुखडे देण्याचं सुचवलं. साहिरने रोशनला फोन करून आठवण केली आणि म्हटलं, 'देखिये, आपने जो वादा किया है उसको निभाना जरूर...' झालं. त्याच वेळी हे शब्द मुखडा समजून रोशनने चाल दिली- 'जो वादा किया वो निभाना पडेगा...' बंदिश जमली असं पाहून साहिरने त्याच क्षणी मुखड्याचा उत्तरार्ध तयार केला. 'रोके जमाना चाहे रोके खुदाई तुमको आना पडेगा, जो वादा किया वो निभाना पडेगा...'

हे सांगताना प्रदीपकुमार पुढे बोलले, मुखड्याचा पूर्वार्ध आणि उत्तरार्ध यात छंद जमला नव्हता. पण रोशन साहेबांनी इतक्या बेमालूमपणे आपल्या चालीत हे शब्द गुंफले की ऐकणाऱ्याला त्यात कुठेही तुटकपणा खटकत नाही. तुम्हाला माहीत आहे? माझ्या चित्रपटातलं



लक्ष्मीकांत-प्यारेलाल



पंचम दा-आरडी बर्मन



शंकर-जयकिशन



संगीतकार रवी



कल्याणजी-आनंदजी



प्रदीपकुमार



बीना रॉय



रहेमान-सुरैया

गाणं आहे म्हणून सांगतोय असं नाही पण पहाडी रागातलं गेल्या पन्नास वर्षांतलं हे सर्वोत्कृष्ट गीत आहे असं मी अभिमानाने म्हणेन.

गाण्याचं रेकॉर्डिंग झाल्यानंतर इंडस्ट्रीतल्या तमाम जाणकारांनी रोशनची वाहवा केली. लता-रफीच्या आवाजातलं हे गाणं आजही तितकंच लोकप्रिय आहे. *ताजमहाल*ची नायिका आणि प्रेमनाथची पत्नी बिना रॉयचंही हे सर्वात आवडतं गाणं आहे. गाण्याच्या नुसत्या उल्लेखाने त्यांचे डोळे चमकतात.

*लव इन टोकियो*मध्ये 'सायोनारा...'सारखं वादागीत देणाऱ्या शंकर-जयकिशनचं आणखी एक गाणं इथे लक्षात घेतलं पाहिजे. चित्रपटाचं नाव आहे *राजहठ*(१९५६). यातही प्रदीपकुमारच नायक आहे. सिंहाचं प्रतीक असलेल्या मिनर्व्हा मूव्हीटोन या सोहराब मोदींच्या बॅनरखाली हा चित्रपट प्रदर्शित झाला होता. प्रदीपकुमारने जयकिशनना विनंती केली की एखादं तरी गीत माझ्या-साठी मुकेशच्या आवाजातलं ठेवा. आणि मुकेश-लताने प्रदीपकुमार-मधुबालासाठी एक वादा गीत छेडलं ते असं.

'ये वादा करो चांद के सामने
भूला तो न दोगे मेरे प्यार को
मेरे हाथ में हाथ दे दो जरा
सहारा मिलेगा मेरे प्यार को...'

या गाण्याची चाल ऐकताच आपल्याला प्रकर्षाने जाणवतं की, हे गाणं खास मुकेशसाठीच स्वरबद्ध केलं गेलंय. असंच एक गाणं महंमद रफीच्या आवाजातलं आहे. *प्यार का सागर*(१९६१) चित्रपटासाठी अलीकडेच निधन पावलेले प्रेम धवन यांनी एक गाणं लिहिलं होतं. हे गीत मुकेशच्या आवाजातच यशस्वी होईल असं भाकीतही खुद्द प्रेम धवन यांनी केलं. त्यावर रवीनेही मुकेशच्या शैलीला साजेसं संगीत दिलं. नंतर कुठे काय बिनसलं कुणास ठाऊक. राजेंद्रकुमारवर चित्रित हे गाणं महंमद रफीने गायलं. रफीनेही मनापासून ते गायलं आणि ते एक अविस्मरणीय गाणं ठरलं. गाण्याचे शब्द आहेत.

'वफा जिनसे की, बेवफा हो गये
वो वादे महोब्बत के क्या हो गये...'

संगीतकार रवीचे संबंध जसे देवेंद्र गोयलशी सलोख्याचे होते तसेच ते बी.आर.चोप्राबरोबर होते. बी.आर.च्या जवळजवळ सगळ्याच चित्रपटांसाठी रवीने संगीत दिलं. त्यातलाच एक चित्रपट होता हमराज. त्याचा नायक होता सुनील दत्त. त्यामुळे गायक म्हणून महेंद्र कपूरचा विचार करण्यात आला. साहिर लुधियानवीच्या गीताचे बोल होते—

'तुम अगर साथ देने का वादा करो
मैं यू ही मस्त नगमें लुटाता रहू...'

हे गाणंही चांगलंच लोकप्रिय झालं.

वादा गीतांबद्दल बोलताना लक्ष्मीकांत प्यारेलाल आणि कल्याणजी-आनंदजी यांचा उल्लेख न करून कसं चालेल. १९५०च्या दशकात लक्ष्मीकांत-प्यारेलालची जोडी कल्याणजी-आनंदजींकडे सहाय्यक संगीतकार म्हणून काम करत होती. त्यानंतर काही काळाने लक्ष्मी-प्यारेने स्वतंत्रपणे काम करायला सुरुवात केली. १९६०च्या दशकात आर. डी., लक्ष्मीकांत-प्यारेलाल आणि कल्याणजी-आनंदजी या संगीतकारांत खेळीमेळीची स्पर्धा होती. या काळात तिघांनीही कमीत कमी दोन दोन 'वादा गीतं' दिली होती. त्यातलंच लक्ष्मीकांत-प्यारेलाल जोडीचं हे हळुवार गीत फारच सुंदर आहे.

बी ग्रेड चित्रपट *फिफ्टी-फिफ्टी*साठी हे गाणं किशोरकुमार-आशा भोसले यांनी गायलेलं. त्याचे शब्द सहज लक्षात राहतील असे होते.

प्यार का वादा फिफ्टी फिफ्टी
क्या है इरादा फिफ्टी फिफ्टी
आधा आधा फिफ्टी फिफ्टी...

तर देव आनंदपुत्र सुनील आनंदला चमकवण्यासाठी लॉँच केलेल्या *आनंद और आनंद*मध्ये पंचम दांनी किशोरकुमारच्या आवाजात दिलेलं हे गीतंही चांगलं होतं.

हो वादों की शाम आई
यारों के नाम आई
छलकती जाम लाई
दिवानों के नाम आई

कल्याणजी तर अशा गीतांना नेहमी गाजराची पुंगीच म्हणत. वाजली तर वाजली नाहीतर खाल्ली. पण *उपकार* चित्रपटातलं प्राणवर चित्रित त्यांचं एक गीत मन्ना डेच्या स्वरांतलं आहे जे आजही आपल्या ओठांवर अगदी सहजी येतं.

कसमें, वादे, प्यार, वफा सब
बाते है बातों का क्या
कोई किसी का नही है झूठे
नाते है नातों का क्या...?

तर अशी ही गीतं. दिल्या-घेतल्या वचनांची पुनः पुन्हा आठवण करून देणारी. अशा गीतांचा ट्रेन्ड सुरू करण्याचं श्रेय संगीतकार सज्जाद हुसेन यांना द्यायला हवं. १९५०मध्ये खेल चित्रपटासाठी देव आनंद-नर्गिस या जोडीसाठी लताच्या आवाजात त्यांनी हे गीत संगीतबद्ध केलं होतं...

जाते हो तो जाओ,
हम भी यहां वादों के सहारे जी लेंगे...●